नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 29/01/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## अवैधरीत्या सुगंधीत तंबाखुची वाहतुक करणारे आरोपी गजाआड, वाहनासह एकूण किंमती 83,840/— रु. चा माल जप्त

पोस्टे. केळवद :— अंतर्गत 01 किमी अंतरावर रामपुरी फाटा येथे दिनांक 22/01/2021 चे 18.30 ते 19.00 वा. दरम्यान केळवद पोलीसांना गुप्त माहिती मिळली की, काही इसम आपले वाहनात अवैधरीत्या सुंगधीत तंबाखुची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन केळवद पोलीसांचे पथक तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच— 40/सी.बी. 7634 क्रमांकाच्या ॲक्टीव्हाचा चालक आरोपी नामे— किशोर विठोबा कुथे, वय 50 वर्ष, रा. पंचायत समिती जवळ, ढोमणे लेआउट, सावनेर याला थांबवून सदरची ॲक्टीव्हा गाडी चेक केले असता गाडीमध्ये शरीरास अपायकारक असलेला सुंगधीत तंबाखुचे पॉकेट व बंडल किंमती 13,840/— रु. चा माल मिळुन आल्याने गाडीसह एकूण किंमती 83,840/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन केळवद येथे कलम 328,272,273,188 भादंवी. सहकलम 26(1)(2) आयव्ही, 27(3)इ, 30(2)ए सहकलम3(1) झेड, झेडआयआयआय, व्हीशिक्षापात्र कलम 59 अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम 2006 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीला अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. दिलीप ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक अर्जुन राठोड, पोलीस नायक रविन्द्र चटप, रविन्द्र चटप, सचिन येलकर, गुणवंता डाखोळे यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर